उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

**हे वार्तापत्र शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांसाठी आणि शिक्षणात रस असणाऱ्यांसाठी**

**पत्र ३, महिना – फेब्रुवारी २०१७**

**बिडे (कोरकू) = उठा (मराठी)**

उन्नती संस्थेद्वारा प्रकाशित -

# बिडे वार्तापत्र

---

## किती दिवस गैरहजर राहते ही सुनिता!

अकोट तालुक्यातील झुमरीतलैय्या गावात (नाव बदलले आहे) राहते सुनिता. आई वडील कामासाठी राहतात लांबच्या गावं. सुनिता राहते झुमरीतलैय्या गावात आजी आजोबांसोबत आणि शिकते दुसऱ्या वर्गात. पण सुनिता अनेक वेळा आई वडिलांकडे रहायला जाते आणि मग पंधरा दिवस तिकडेच राहते. एवढे दिवस मग तिची शाळाही बुडते. शाळा बुडाली की तिचा अभ्यासही बुडतो. शाळेत शिकवलेले सुनिता विसरून जाते आणि मग तिला अक्षरेही वाचता येत नाहीत.

## मुले सतत गैरहजर राहिली तर अभ्यासात मागे मागे पडत जातात...

आदिवासी भागातील शाळांमध्ये दिवाळी नंतर मुलांची गळती खूप मोठ्या प्रमाणावर होते, हा खूप मोठा प्रश्न शिक्षकांसमोर असतो.

घरातील सदस्याची तब्बेत बरी नाही म्हणून, तर एखाद्या देवाला किवा झाडाला ठेवलेला नवस फेडायला जायचे म्हणून, बाहेरगावी जातात. लग्न कार्य राहिले तर पारंपारिक नृत्य हे दोन दिवस अहोरात्र चालत राहते. जत्रा ही तर त्यांचा जीवनाशी अगदी एकरूप, जत्रा म्हणजे त्यांच्यासाठी पर्वणीच. हे सर्व सण उत्सव ते बरेच दिवस अगदी आनंदाने साजरे करतात, पण हे अनेक दिवस साजरे केल्याने मुलांची शाळा पडते, मुलं या कार्यक्रमांमध्ये रममाण होतात, जत्रा किंवा नवस असला कि एक दिवसाचा असतो, पण मुलं आठवडाभर शाळेत येत नाही. तसेच गावांमध्ये दिवाळी नंतर काम नसल्याने लोक जुरी करण्यासाठी गाव सोडून बाहेरगावी जातात, सोबत मुलांना सुद्धा नेतात, त्यामुळे मुलांची दिवाळी नंतर मोठ्या प्रमाणावर गळती होते. त्याचा परिणाम मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर होत असतो.

### “ रोज शाळेत जायचं, घरी नाही राहायचं ”

***काय करायला हवे मग आपण आई-वडिलांनी ?***

*- यात्रेला गेलात तर दुसऱ्या दिवशी गावात परत या आणि मुलांना शाळेत पाठवा.*

*- नवसाला जायचे असले तरी सकाळी मुलांना शाळेत पाठवा आणि जेवणाच्या वेळी मुलांना शाळेतून शिक्षकांच्या परवानगीने घेऊन जा.*

*- लग्नाच्या दिवशीही मुलांना सकाळी शाळेत पाठवा आणि जेवणाच्या वेळी मुलांना शाळेतून शिक्षकांच्या परवानगीने घेऊन जा.*

*- बाहेरगावी नातेवाइकांकडे सुखाच्या किंवा दुःखाच्या कार्यक्रमाला जासाल तेव्हा मुलांना सोबत नेऊ नका. त्यांना शाळेत जाऊ द्या. अगदीच आवश्यकता असेल तर एक दिवसच न्या.*

*- आश्रमशाळांची मुले दिवाळीत घरी येतात. सुट्टी संपली की त्यांना लगेच शाळेत सोडून या.*

*- कामाला बाहेरगावी जासाल तेव्हा मुलांना गावातच नातेवाइकांकडे ठेवा, म्हणजे मुलांची शाळा बुडणार नाही.*

*- पहिलीच्या मुलांना घेऊन जायला लागत असेल शिक्षकांना सांगून न्या. ते मुलांच्या शाळेची व्यवस्था तुमच्या कामाच्या गावी करतील.*

*आपण पिक्चर पाहत असतो तेव्हा जर काही काम आले तर आपण बाहेर जातो. नंतर आल्यावर मधला पिक्चर बुडालेला असतो. मग आपल्याला पूर्ण पिक्चर समजत नाही. हीच गोष्ट मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत होते. मधूनच शाळा पडली तर मुले मागचे विसरून जातात आणि शिकवलेले समजत नाही.*

## मुलांचे स्थलांतर दसोडे सरांनी थांबवले!!

रुधाडी गावातील जि. प. शाळेचे मुख्याध्यापक श्री. मंगेश शिवलिंगप्पा दसोडे, यांनी गावातील ७ मुलांना स्थलांतरित होण्यापासून थांबविले. स्थलांतर करणाऱ्या पालकांना त्यांनी विश्वास दिला की ही मुलं माझ्या जबाबदारीवर गावात नातेवाईकांकडे राहू द्या, त्यांच्या जेवणाची व्यवस्था मी पाहतो. त्यामुळे पालकांनी मुख्याध्यापकांवर आणि शाळा व्यवस्थापन समितीवर विश्वास ठेवला आणि आपली मुलं घरातील वयस्कर, नातेवाईक यांच्या कडे ठेवली.

गावात लग्न, नवस किंवा जत्रा असली, तर मुलं शाळेच्या वेळात जेवणाच्या सुटीत काही वेळापुरतीच जातात, नंतर लगेच नियमित शाळेत येतात. मुलाचं मन शाळेत रमेल याकरिता सर नेहमी नाविन्यपूर्ण उपक्रमांची आखणी करतात, उदा., नियमित पेपर वाचन, चित्र पाहतात, बातम्या ऐकतात, वाचतात. आता मुलांना नोटबंदी सारखे विषय ही चांगले समजू लागलेत. त्याकरिता सर मुलांना ATM कार्ड बँकेकडून उपलब्ध करून देणार आहेत. जर असे नाविन्य पूर्ण उपक्रम असतील तर मुलांचे पण मन शाळेत लागेल.

**शिक्षक काय करू शकतात?**

*मुलांची शाळा गळती थांबविण्यासाठी शिक्षक हे आपआपल्या परीने प्रयत्न करत असतील, पण ते पुरेसे आहेत का हे आपणच तपासायला हवे.*

- *शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठका या गावात सायंकाळी घ्याव्यात, जेणेकरून इतर पालक सुद्धा सहभागी होऊ शकतात, आणि नियमित मुलं शाळेत येत नसल्याने मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर कसा परिणाम होतो, याविषयी चर्चा करता येईल. नियमित मुलं आणि अनियमित मुलांच्या शैक्षणिक प्रगतीविषयी पालकांना सांगा, त्यामुळे पालकांना वस्तुस्थिती कळेल, शिक्षक करत असलेली धडपड त्यांना दिसेल, त्यामुळे ते या कामात अधिक सहकार्य करतील.*
- *शाळेत जर मुलांना आनंददायक वातावरण असेल तर मुले शाळेत यायलाच मागतात. मुले शाळेत रमतील, आनंदी असतील यासाठी तुम्ही प्रयत्न करू शकाल.*
- *शासनाची हंगामी वसतिगृह योजना आपल्या गावात लागू होत असेल तर ती आणता येईल.*

**एक तास अभ्यास!!**

"मी बकरीसाठी चारा आणायला ३ वाजता जात असताना मला सर बाहेर ओट्यावर खुर्ची टाकून बसलेले दिसले. मी त्यांना विचारले, काय सुरु आहे गुरुजी? ते म्हणाले, मुले अभ्यास करत आहेत.... नंतर ४ वाजता परत येत होतो, तर काय! गुरुजी जसेच्या तसेच खुर्चीवर बसलेले. मी परत विचारले काय गुरुजी, झाला नाही का अभ्यास? तर गुरुजी म्हणतात की नाही, अजून चालू आहे अभ्यास.

तेल्हारा तालुक्यातील झुमरीतलैया गावातील शंभू नारद (सत्य घटना असून, गावाचे व पालकाचे नाव बदलले आहे)

## अधिकारी जाणार मुलांच्या घरी...

शिक्षण विभागाचे वर्ग १ व २ चे अधिकारी कोणत्याही २० विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन भाषा, गणित, इंग्रजी या तीन विषयांची परीक्षा घेणार आहेत. हे विद्यार्थी वर्ग १ ते ८ मधील असतील. एखादा विद्यार्थी कच्चा आढळला तर शाळेतील शिक्षकांशी चर्चा करून उपाय शोधले जाणार आहेत.

तर तुमच्या गावात हे अधिकारी येत आहेत का, तुमच्याशी बोलतात का, मुलांशी बोलतात का, त्यांना काय येत आहे व काय येत नाही हे पाहतात का याकडे तुम्ही लक्ष ठेवा.

## मुलांची प्रगती आपणच तपासूया !!

जूनमध्ये शाळा सुरु झाल्या आणि आता शाळेचे वर्ष संपायला एक महिना उरला. मुलं वर्षभर काय शिकली आणि काय नाही याची चाचणी शाळा घेतच असते. पण तुमच्या पाल्याला लिहा-वाचायला येतं का हे पाहण्याची जबाबदारी तुमची सुद्धा आहे. ते कसं तपासणार हे आम्ही पुढच्या महिन्यात तुम्हाला सांगू.

*समाप्त*